तळे तालुक्याचे भाग्यविधाते कै.अशोक लोखंडे

कै. अशोक लोखंडे यांच्या निधनास ८ मे रोजी ३५ वर्ष पूर्ण होत आहे त्यानिमित्ताने त्यांचे सहकारी डॉ. श्रीनिवास वेदक यांनी वाहिलेली आदरांजली

अशोक लोखंडे, एक लोभस नेतृत्व आपल्यातून काळाने हिरावून नेल्याला ८ मे २०१९ रोजी ३५ वर्ष पूर्ण होत आहेत. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्मचारी वर्गाच्या क्रेडीट सोसायटीच्या रौप्य महोत्सवा निमित्त अशोक लोखंडे सकाळी ९ वाजताच आले होते. डाक बंगल्यावर जाईपर्यंत त्यांना छातीत तीव्र वेदना सुरु झाल्या व औषोधोपचार मिळण्याअगोदरच पेण डाक बंगल्यातच त्यांचे निधन झाले. तात्काळ जिल्हाभर बातमी पसरली. जिल्ह्यातील कार्यकर्ते हळहळले. बॅ.अंतुले साहेबांनी त्यांना ११ वाजता पुष्पांजली वाहिल्यावर सर्व कार्यक्रम रद्द झाल्याचे जाहीर झाले.

तळे गांवात बातमी आल्याबरोबर गांव सुन्न झाले संपूर्ण गांवावर शोककळा पसरते म्हणजे काय हे त्या दिवशी दिसून आले. पंचचाळीशीच्या ऐन तारुण्यात त्यांना असे तडकाफडकी नेण्यापेक्षा आम्हाला नेले असते तर बरे झाले असते असे काहीजण म्हणत होते आणि अशी पाठीमागे म्हणणारी माणसे निर्माण करणे हेच नेतृत्वाचे उच्च यश होय.

१९७२ च्या जि.प.च्या निवडणुकीच्या निमित्ताने त्यांचे माणगांव तालुक्याच्या काँग्रेसच्या राजकारणांत पदार्पण झाले तळे भागातील अटीतटीच्या निवडणुकीत यश मिळवू दिले. पुढील वर्षी तळे मांदाड-रोवळा हा राज्य महामार्ग होण्याच्या निमित्ताने बॅ.अंतुले व त्यांची जवळीक निर्माण झाली. ती वाढत जाऊन ते रायगड जिल्हा काँग्रेसचे सेक्रेटरी झाले. आणिबाणीच्या काळांत बॅरिस्टर साहेब अ.भा.काँ.चे सर चिटणीस म्हणून दिल्लीत असत त्यावेळी रायगड जिल्ह्यांत संघटना बांधण्यासाठी ना. रविंद्र राऊतांना सहाय्य करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. ते संपर्क माध्यम होते. स्वतःसाठी बॅरिस्टर साहेबांकडे त्यांनी कधीच मागितले नाही म्हणून अंतुले साहेब त्यांना आदर्श कार्यकर्ता मानत व विश्वासांतील गोष्टींची चर्चाही करीत. अंतुले साहेबांनी त्यांची कोकण विभागीय निवड मंडळावर नेमणूक केली. त्यांचे संपूर्ण मानधन त्यांनी समाज कार्यासाठीच वापरले.

नळबाजारातील आपल्या नारळाच्या दुकानांत धडाधडीने १२/१२ तास काम करुन पुरेशी माया मिळवली होती. स्वच्छ आणि दिलदार असल्यामुळे विरोधक स्वप्नातही त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा आरोप कधी करु शकले नाहीत. विरोधकही त्यांना मानीत असत व आपल्या कंपूत ओढण्याचा प्रयत्न करीत. त्यांच्या अनेक प्रलोभनाना ते बळी न पडल्याने रायगड जिल्हा काँग्रेस कार्यकारणीत त्यांच्या शब्दाला मान असे त्यांचा मित्र परिवारही सर्व जिल्हाभर पसरला होता.

मालाठे गावातील लोक त्यांना देवासारखे मानीत. आपल्या गांवातील एक वकील झालेला तरुण जिल्ह्यातील थोरामोठयाचे आदरणीय स्थान झाल्याबद्दल त्यांना सार्थ अभिमान होता. मालाठे गांवात नारुची साथ नेहमी यावयाची. नळाची योजना कार्यान्वीत होण्यासाठी त्यानी १० टक्के लोकवर्गणी देऊ केली. त्यांच्या सुदैवाने जवळच पाण्याचा पुरवठा मिळाल्यामुळे त्यांच्या गावात नळपाणी पुरवठा योजना आली.

रायगड जिल्हा नियोजन मंडळात काम करीत असताना रोहा-माणगांव मतदार संघात नियोजनाचा पैसा पूर्ण खर्च होऊन विकास कामे समतोल कशी होतील याकडे त्यांचे पूर्ण लक्ष असे. आग्रही मत मांडून वावे धरणाचे काम मार्गी लागले. संजय गांधी निराधार योजनेचे सभापती असताना गरीबातल्या गरीब माणसापर्यंत तो पैसा फाटे न फुटता कसा पोहचेल याकडे त्यांचे बारीक लक्ष असे.

माणगांव तालुक्यातील आमदार निधीतून पहिला डांबरी रस्ता करुन घेण्याचा मान त्यांनाच मिळाला. वीज, विद्यार्थ्यांसाठी एस्.टी.ची सोय या बारीक सारीक गोष्टीतही त्यांचे बारीक लक्ष असे. आठवडयातून दोन दिवस ते आपल्या तालुक्यासाठी निष्काम कर्मयोग्यांसारखे देत असत.

पूर्वीच्या अस्पृश्य जातींने पाणी काढल्याने विहिर बाटली या अंधश्रध्देने परिसरात वितुष्ट आले होते त्यांनी कुशलतेने त्यातून मार्ग काढून दिला व गावाची एकी टिकवली.

निर्मल प्रसन्न व्यक्तिमत्त्व, तेजस्वी समप्रमाण शरीरयष्टी, मधुरवाणी, काटकता, कष्टाळूपणा व दिलदार स्वभावाने त्यांनी परिसराला जिंकून घेतले होते म्हणूनच त्यांच्या स्मृत्यर्थ प्रत्येक वर्षी क्रिकेट स्पर्धा ठेवतात. त्यांत सर्व परिसर तन मन धनाने सामील होतो.

मृत्यूपूर्वी २ महिने अगोदर त्यांनी तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळ स्थापण्यात पुढाकार घेतला. त्याच संस्थेच्या द.ग.तटकरे कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे चेअरमन म्हणून काम करण्यांत मला अभिमान वाटत आहे. मांदाड हायस्कूलला अनुदान मिळवून देण्यांत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या स्मृत्यर्थ त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या मित्रांनी व पिटसईच्या पंचक्रोशीनी अशोक लोखंडे माध्यमिक विद्यामंदिर स्थापन करुन त्यांची स्मृती चिरंतर ठेवली आहे.

माणूस म्हणून मोठा असलेला मोठा माणूस निघून गेल्यावर निर्माण होणारी पोकळी फारच मोठी असते. तीचे परिणाम आजही जाणवतात. त्यांच्या या यशोगाथेने तरुणांना सदोदीत प्रेरणा मिळत राहो!

डॉ. श्रीनिवास वेदक